सत्यमेव जयते

# राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष
# राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान
# (महाराष्ट्र राज्य)

जा.क्र /रा.गां.पं.स.अ./प्रशि./७४४/२०१६ दि. २५ मे, २०१६

प्रति,

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, ................(सर्व)**

**विषय - 'आमचं गाव आमचा विकास' अंतर्गत प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमासाठी निधी वितरण तक्ता व मार्गदर्शक सूचना मधील बदल...**

संदर्भ - १. या कार्यालयाचे पत्र जा.क्र /रा.गां.पं.स.अ./प्रशि./७३७/२०१६, दि. १९ मे, २०१६
२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र /रा.गां.पं.स.अ./प्रशि./७२६/२०१६, दि. १२ मे, २०१६

उपरोक्त संदर्भिय १ मधील पत्राने आपल्या जिल्ह्यास 'आमचं गाव आमचा विकास' उपक्रमासाठी निधी वितरीत करणेत आलेला आहे. सदर पत्रासोबत जोडण्यात आलेल्या निधी वितरण तक्त्यामध्ये खालील बदल वाचण्यात यावेत.

अ) उपक्रम क्रमांक १ मधील लक्ष घटक **जि.प.विभाग प्रमुख** ऐवजी **जि.प.विभाग प्रमुख व जिल्हास्तरीय इतर शासकीय विभागांचे विभाग प्रमुख** असे वाचावे.

ब) प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन व सनियंत्रण खर्च यास **उपक्रम ७** ऐवजी **उपक्रम ९** असे वाचावे. (उपक्रम ८ स्वतंत्रपणे कळविणेत येणार आहे.)

२. उपरोक्त संदर्भ २ अन्वये प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमांसाठी उपक्रमनिहाय मार्गदर्शक सूचना पाठविणेत आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार काही जिल्ह्यांकडून सुधारणा कळविणेत आल्यामुळे उपक्रम ६ व ७ मधील लक्ष घटकांमध्ये बदल झालेला आहे. या बदलासह उपक्रम ६ व ७ च्या सुधारीत मार्गदर्शक सूचना आणि उपक्रम ९ च्या मार्गदर्शक सूचना सोबत जोडणेत आलेल्या आहेत.

३. उपक्रम १ मध्ये नमुद जि.प.विभाग प्रमुख व जिल्हास्तरीय इतर शासकीय विभागांचे विभाग प्रमुख यांच्या जिल्हाधिकारी यांचेकडील बैठकीसाठी प्रतीव्यक्ती रू. १५०/- प्रमाणे व

जास्तीतजास्त रू.४४००/- प्रती जिल्हा खर्चाची मर्यादा आहे. (या उपक्रमासाठी राज्यासाठी एकूण तरतूद रू. १.५० लक्ष मंजूर आहे.)

वरीलप्रमाणे बदलाची नोंद घेण्यात यावी.

**सोबत :** उपक्रम ६ व ७ च्या सुधारीत मार्गदर्शक सूचना आणि उपक्रम ९ च्या मार्गदर्शक सूचना

**राज्य प्रकल्प संचालक** २५/५/१६
राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष,
राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत :**

१) मा.प्रधान सचिव, (ग्राम विकास व पंचायतराज), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४००००१ यांना माहितीस्तव सादर
२) संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे यांना आवश्यक कार्यवाहीसाठी
३) उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे, नाशिक, कोकण, औरंगाबाद, अमरावती, नागपूर विभाग यांना माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
४) विभागीय प्रकल्प उप संचालक, रा.गां.पं.स.अ.कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे, नाशिक, कोकण, औरंगाबाद, अमरावती, नागपूर विभाग यांना वआवश्यक त्या कार्यवाहीसाठी
५) लेखापाल, राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान, महाराष्ट्र राज्य, पुणे